म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १७८२



# आवर्त

अनुराधा पोतदार

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ६०३४६ दि: ३११०५
१७८२ १५।१२।६८

नवे कवी

नवी कविता ३

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१६९५६
ग्रं. क्र.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :– खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक / मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

31 DEC 1975
23 AUG 1978

[ कृ. मा. प. ]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ६०३४६ वि: काव्य
क्रमांक १७८२ नों. दि. १५।१२।६८

काव्य
६०३४६
१५।१२।६८
१७८२

नवे कवी

नवी कविता ३

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १९९५६
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

१

**ग्रेस**

संध्याकाळच्या कविता

२

**ना. धों. महानोर**

रानातल्या कविता

३

**अनुराधा पोतदार**

आवर्त

४

**शंकर वैद्य**

कालस्वर

५

**वसंत सावंत**

स्वस्तिक

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ६०३८६ ... वि. ७१०२५
क्रमांक १६८२ ... नोंद दि. १५।१।८८

# आवर्त

अनुराधा पोतदार

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

© अनुराधा पोतदार

पहिली आवृत्ती : १९६९/१८९०

लेखनकाल : १९५९ ते १९६८

मुद्रक : वि. पु. भागवत, मौज प्रिंटिंग ब्यूरो, खटाववाडी, गिरगाव, मुंबई ४

प्रकाशक : ग. रा. भटकळ, पॉप्युलर प्रकाशन, ३५ सी ताडदेव रोड, मुंबई ३४

ती. कवी दत्तांना –

तुम्हाला मी पाहिलंही नाही.
पण आपलं नातं मनानं आजवर
नकळताच जपलं. माझी ही
शब्दांतील रूपं तुम्हालाच
अर्पण करते.

उषा.

१५ डिसेंबर १९६८.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. ७६७५६

आवर्त

तमास बिलगुनि ९
अशीच मख्मल तिथेहि होती १०
असें कधीतरि १०
डोळ्यांखाली लपल्या छाया ११
कानांच्या संपुटांत घेतलें झेलुन १२
असें रातराणीने १३
जर असते १४
तुला पहावेंसें वाटे १५
अशा अधीऱ्या वाऱ्याशीं १६
असे शब्द माखून १६
खरेंच का तुज हवेंच उत्तर १७
अशी प्राक्तनाची १८
माथ्यावरती आहे छप्पर १९
भिनलें जेव्हा १९
खिन्न गगन २०
मिटले डोळे २१
धुंद उसासत सागर पुढती २१
धुक्याआड तू २२
दुपारच्या तल्खलींत २३
हसत राहिलें २४
त्या रक्ताची २५
अशा सावळ्या संध्येपाशी २५
पुन्हा पुन्हा मी—ओंजळीमधुनी २६
माझी अबोलीची प्रीत २६
स्वप्न धुंद त्या अर्धनिशेचें २७
घुसमटतें आभाळच जेव्हा २७
आज हरवली २८
त्या मोहरल्या दिवसांखातर २८
हेंच शल्य रे २९
खरेंच सांगूं ३०
नाही कसें म्हणूं तुला ३१
भिजल्या वाऱ्याचें ३२
असा कधी ना ३३
हळूच नेलें ३४
दिशा उजळल्या ३४
मिटून डोळे ३५
वाट तुझी पाहण्यांत ३५
वृक्षावरती टेकुनि माथें ३६
त्या रात्रीला ३६
अभ्रांच्या दाटींत हरवलें ३७
अशा पहाटे ३७
चार भिंती कधी काळीं ३८
हळूच येइन ३९
डोळ्यांमधली बधीर तृष्णा ४०

गुलाबकळीच्या रंगांत मिळावें ४१
नितळनिळ्या अन् उजळमोकळ्या ४१
भिंतींत कोंडलेला ४२
पहिल्या रात्रीच्या ४२
अंधारून आलें बाहेर ४३
घ्यायलाच हवें कांही ४३
ओठ टेकतें ४४
भुरुभुरु पिंगट रेशिमजावळ ४५
उन्हामध्ये पावसाला रुपडं येतं ४६
निरोप दिलास तेव्हा सखी ४६
पुसट जरासें ४७
अता घेतली झेप एकदा ४८
माझ्या मनिंच्या पिसाट लाटा ४९
शिशिरामधल्या पहाटवेळीं ४९
तळहाताच्या रेषांवरती ५०
पायांवरती चढली लाली ५०
अक्षरांहून आहे बोलकी ५१
हिरवळलेल्या छपरावरती ५१
बांधिन घरकुल ५२
चांदण्याच्या त्या क्षणाला ५२
आलिंगन डोळ्यांनी ५३
पिसाट झाडें, सुसाट वारा ५३
कसें साठवूं ५४
काळजाची हाक वेडी ५४
आरपार कापणारी ५५
चुकुन कधी जर ५६
किती तुझें तुझें व्हावें ५७
रुळणारी बट माझी ५७
पुसट जरासें ५८
भगभगीत रखरखली ५९
भरून आलें आभाळाला ६०
आवंढा गिळुनी ६१
चुकल्या वाटा ६२
दाराबाहेर टाकितें ६२
दार धरितें पदर ६३
या अशा फितवुनी वाटा ६३
दुखावणें...सुखावणें... ६४
ओठ दिले काजळले ६४
झोपेंतहि ६५
डोळ्यांच्या मासोळ्या ६५
का स्वप्नच होतें ६६
तो शब्दांचा भूलभुलैय्या ६६
तशी मी जातें ना— ६७
सांज कलते ६७

તમાસ બિલગુનિ સાંજસાવળ્યા, ગૂજ જિવાચે સાંગત અસતાં..
ઉરી બાવરી કુણી ચાંદણી જુળલી વાટ હિ ધુંડિત અસતાં..
– અશા અવેળી, કાતરવેળી, સાંકળતાં જડ મિટલ્યા નયની,
અબોલ તુઝિયા અધરાંવરતી, નાંવ કુણાચે ફુલતે અજુની..
સ્તુકમા કોવળ્યા આઠવણીંની કાળિજ હુરહુરે ગળબળતે કાં
મિટલે અન્તર યેતા ઉમલુન, સાંકળલે જડ ઓઘળલે કાં.
સાંગશીલ તર, સાંગચ રેતુકે. દુજો ન આતા ઉરલે કાંહીં
સાંગ લવકે. કોસળતાંના હંસાતિલ વેડ્યા દિશાહિ દાહી.

गुलाबकळीच्या रंगांत मिळावें ४१
नितळनिळ्या अन् उजळमोकळ्या ४१
भिंतींत कोंडलेला ४२
पहिल्या रात्रीच्या ४२
अंधारून आलें बाहेर ४३
घ्यायलाच हवें कांही ४३
ओठ टेकतें ४४
भुरुभुरु पिंगट रेशिमजावळ ४५
उन्हामध्ये पावसाला रुपडं येतं ४६
निरोप दिलास तेव्हा सखी ४६
पुसट जरासें ४७
अता घेतली झेप एकदा ४८
माझ्या मनिंच्या पिसाट लाटा ४९
शिशिरामधल्या पहाटवेळीं ४९
तळहाताच्या रेषांवरती ५०
पायांवरती चढली लाली ५०
अक्षरांहून आहे बोलकी ५१
हिरवळलेल्या छपरावरती ५१
बांधिन घरकुल ५२
चांदण्याच्या त्या क्षणाला ५२
आलिंगन डोळ्यांनी ५३
पिसाट झाडें, सुसाट वारा ५३
कसें साठवूं ५४
काळजाची हाक वेडी ५४
आरपार कापणारी ५५
चुकुन कधी जर ५६
किती तुझें तुझें व्हावें ५७
रुळणारी बट माझी ५७
पुसट जरासें ५८
भगभगीत रखरखली ५९
भरुन आलें आभाळाला ६०
आवंढा गिळुनी ६१
चुकल्या वाटा ६२
दाराबाहेर टाकितें ६२
दार धरितें पदर ६३
या अशा फितवुनी वाटा ६३
दुखावणें...सुखावणें... ६४
ओठ दिले काजळले ६४
झोपेंतहि ६५
डोळ्यांच्या मासोळ्या ६५
का स्वप्नच होतें ६६
तो शब्दांचा भूलभुलैय्या ६६
तशी मी जातें ना— ६७
सांज कलते ६७

तमाम बिलगुनि सांजसावल्या, गूज जिवाचे सांगत असतां..
उरी बावरी कुणी चांदणी झुरली वाटहि धुंडित असतां..
– अशा अवेळी, कातरवेळीं, सांकळतां जड मिटल्या नयनी,
अबोल तुझिया अधरांवरती, नांव कुणाचे झुलते अजुनी..
खुळ्या कोवळ्या आठवणींनी काळिज दुरवरे गलबलले कां
मिटले अन्तर येता उमलुन, सांकळले जड ओघळले कां.
सांगशील तर, सांगच तुजके. दुजो न आता उरले कांही
सांग लवकर. कोसळतांना हंसतील वेड्या दिशाहि दाही.

## अशीच मख्मल तिथेहि होती

अशीच मख्मल तिथेहि होती
फूलरास अन् पायतळाशीं;
असेंच गहिरें नभही मिष्किल
लवलें होतें लाल धरेशीं.

स्मरतें आता एवढेंच परि
चुरडत होतें पायीं कांही—
फूल कोवळें ? पान अनोखें ?
की हृदयाचे धागे कांही ?

## असें कधीतरि

"असें कधीतरि जातें चमकुन
तें हसणें तव लोभसवाणें....
—तें तेव्हाचें, नित फुलणारें
आणि जाहलें आज कसेंसें...."

ऐकत असतां बोल तुझे हे
उसळुन आलें काहुर वेडें
अन् लपवाया तें तुजपासुन
तेंच हासलें हासु कसेंसें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ६०३७६ दि. ३।१०।७५
क्रमांक १६८२ नों. दि. १५।१२।६८

## डोळ्यांखाली लपल्या छाया

डोळ्यांखाली लपल्या छाया,
....गडद सावल्या साकळल्या
तुझ्या नि माझ्या
शून्य रात्रिच्या.
भोवळलेली रात्र तिथे अन्
इथे क्षणांतुन भ्रमतां थिजली
प्राणावाचुन छाया उरली
त्या रात्रीची.
....मुकी पोरकी
श्रांत साउली
धुंदित आली;
लवली, लपली
डोळ्यांखाली
....तुझ्या नि माझ्या.

## कानांच्या संपुटांत घेतलें झेलुन

कानांच्या संपुटांत घेतलें झेलुन
स्वरांचें झुळझुळतें लाघव :
सतार होती बोलत....होती स्फुंदत
ओठांवर प्राणांची वाहती जखम.

सतार होती बोलत, विनवत, रिझवत
विभ्रमचतुर पावलांनी होती रुणझुणत :
नेत्रांचे तीर, भिवयांचें धनु,
मानेचे वळसे, लवलवती हनु—
पाहिलें ना सारें, स्वरांच्या वलयांत
त्या अनुनयाच्या गीतांत.

आंत बोलूं लागली अबोलकी सतार—
ओठांच्या कोपऱ्यांत निसटलें हासू,
मिटल्या फुलांतुन झेपावले पराग
स्वरांचें वादळ कलंडलें जेव्हा,
आंत हरवले कमलांचे तंतू....

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम 603०६ वि: १७०५
क्रमांक १६८२ नों: दि: १५-८-६८

## असें रातराणीने

असें रातराणीने
खिडकीशीं फुलूं नये;
गंधमत्त वादळांत
एकटिला सोडुं नये.

असें रातराणीने
रक्त रक्त उधळुं नये;
वादळतां थेंब थेंब
वैऱ्यासम खिजवुं नये.

असें रातराणीने
जग सीधें फितवुं नये;
ढासळतां तोल तोल
अंगचोर निसटुं नये.

## जर असते....

जर असते हातांतुन हात
तर डोळ्यांतुन मिळतें उत्तर,
भोवळवेड्या शब्दांचेंही
असतें झालें अबोल अंतर;

गहिवरलेल्या मौनाचेंही
फिरलें असतें पीस मुखावर,
अस्तित्वाच्या गंधक्षणाला
स्वरवेलीचे फुटते अंकुर.

दूर तिथे तू आणि इथे मी;
जरा दूरवर....सारें धूसर;
प्रश्नहि विरला, विरलें उत्तर;
उरलें एकच विषण्ण काहुर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर,
अनुक्रम ७०३२६ दि: १७०५
१७८२ नों दि ९५-८-६८

## तुला पहावेंसें वाटे

तुला पहावेंसें वाटे :
        भिजूं भिजूं झाली माती,
डोळ्यांतल्या बाहुलीची
        विझूं विझूं झाली कांती.

सैरभैर लाटांनाही
        झेपावतां भेटे तीर;
खोल खोल जळालाही
        कधी वेढतो ना पूर.

सोसवेना अता....सांगूं
        काठोकाठ दाटे प्राण;
चुकलेल्या वाटेलाही
        सुंगधाची पटे खूण.

तुला पहावेंसें वाटे;
        तूंही म्हणावें अधीर
डोळ्यांतल्या बाहुलीने
        किती धरावा रे धीर ?

## अशा अधीऱ्या वाऱ्याशीं

अशा अधीऱ्या वाऱ्याशीं    कांही ठेविलें जपून :
जरा शैशवाची खूण....    जरा यौवनाचें धन.

अशा ओलेत्या वाऱ्याशीं    कांही राहिलें गुंतून,
तहानल्या अंतराने....    कांही दिलें निरखून.

अशा वादळी वाऱ्याशीं    कांही टाकिलें गहाण;
धुंदावल्या काळजानें....    जाऊं नये ओसंडून.

आणि बावऱ्या वाऱ्याने    कांही घेतलें मागून.
"तुझें कांही, माझें कांही...."    हीच त्याची वेडी धून.

## असे शब्द माखून

असे शब्द माखून शब्दीं बुडावें,
जरा सांडतां झिर्पुनी आत घ्यावें.
—असे शब्द घ्यावे, असे शब्द द्यावे;
खुळे नेत्र झाकून शब्दीं जगावें.
कधी रक्त उसळून शब्दीं झरावें,
कधी आतल्या वन्हिने शुष्क व्हावें,
कधी प्रीतिने पेटता प्रश्न व्हावें,
रित्या अक्षरीं गूढ धुंदीत जावें.
—असे प्राण अवघे तृषा एक होतां
भुके शब्द वेचून ओठीं पिळावे....

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम........ दि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........

## खरेंच का तुज हवेंच उत्तर

खरेंच का तुज हवेंच उत्तर ?
—पुरे पुरे मग म्हणूं नको तर !
नकोस लपवूं वदन करांतुन,
नकोस बिलगूं क्षणीं अनावर
खरेंच जर तुज हवेंच उत्तर....

खरेंच का तुज हवेंच उत्तर ?
मौनामधुनी उठवूं का स्वर ?
स्वरराजीला फुटतां मोहर
शब्द शब्द मम कविता होइल;
सरीसरींचें उधाण वर्षुन
चिंब चिंब अन् तुलाच भिजविन.
—पुरे पुरे मग म्हणूं नको तर.

डोळ्यांतुन जर हवेंच उत्तर
संध्यारंगीं जरा भिजूं, चल.
जरा कलूं दे चंद्रम खाली,
जरा झुकूं दे रात्र दिवाणी,
हवेंत तरती मूक विराणी
जरा ऐकुं दे मिटल्या नयनीं.
अबोल मी, अन् अबोल तूंही;
साक्ष जिवांना दिशाहि दाही.
उत्तर अवघें जुळेल माझें
लावण्याच्या भावलिपीतुनि.

—वाचत असतां थांबुं नको तर !
जळ ओघळतें पुसूं नको तर !
पुरे पुरे मग म्हणूं नको तर !

## अशी प्राक्तनाची

अशी प्राक्तनाची गळां खेव डसली,
कसे नेत्र उघडूं पाहूं तुला मी;
अशी काळ घाली मिठी जीवघेणी,
कसे बाहु उचलूं भेटूं तुला मी;
असा शोष वेडा रुल्या प्राणगर्भीं,
कसा शब्द ओला ओठीं फुटावा;
अशा श्रांत होतां जिवाच्याच वाती,
कसा दीप हातीं तुझा तेववावा;
किती जन्म सांडून, आलें तिराशीं;
कसे अन् किती सांधलेले तडे;
अरे, ज्योत प्रीतीच माझ्या दिव्याला;
कसें अन् कुणा घालणें सांकडें

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वामित्व.

## माथ्यावरती आहे छप्पर

माथ्यावरती आहे छप्पर,
माथ्याखाली उसेंहि सोशिक;
बरा भिंतिचा सक्त पहारा
भल्याबुऱ्याची करीत राखण.

खिडकीमधुनी बघतो चंद्रम,
बटाबटांतुन रुणुझुणु वारा;
दारापाशी ढाळित चवरी
उभा शेवगा स्वप्नबावरा.

हें सुख साधें आज पुरेसें;
फुटो न वाचा या जन्माला.
शीण दाटला किति जन्मांचा....
हें सुख साधें—आज किनारा.

## भिनलें जेव्हा

भिनलें जेव्हा नसानसांतुन
        डोळयांमधलें हिरवें काजळ,
तुझ्या पावलांसाठी न कळे
        केव्हा झालें भिजली हिरवळ.
तुझ्या तृषेस्तव व्हावें....व्हावें
        मीच सांडती, भरली ओंजळ;
—तुलाच पिउनी, अंकुरतांना
        मी झालें ना माती केवळ.

## खिन्न गगन

खिन्न गगन....चंद्र फिका,
गालावर अश्रु सुका;
निद्रेविण उरला कां
स्वप्नांचा नाद मुका....

विद्धपंख पक्ष्यापरि
खिळलें मी, रिक्त उरीं;
चंद्र फिका बघतांना
दिससी तू नयनांना.

तूंच काय विझलेला,
ज्योतीविण उरलेला,
जपत उरीं रक्तझरा
क्षीणतेज हसणारा....

तूच काय....तूच काय....
उरला ना अंतराय;
चंद्रवदन हें बघतें,
अंतरांत मी जळतें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्र
अनुक्रम 60386 वि:
क्रमांक 96820 नों दि 91024
15-8-68
१६५५६

## मिटले डोळे

मिटले डोळे तरि ओघळतें
वांझ, अभागी पाणी खारें;
म्हणूं कशाला अश्रु, आसवें....
म्हणशिल हेंही नाटक सारें.

## धुंद उसासत सागर पुढती

धुंद उसासत सागर पुढती,
नभचुंबित हे माड सभोती,
नील नभीं तारांचें संगित,
अन् चंद्राचे श्वास सुगंधित.

क्षणांत सुटले वेढित सारे
'नाहिस तू'चे पिसाट वारे;
'नहिस तू'चें भिनलें वादळ;
माडहि झुकले....ढळले तारे.

# धुक्याआड तू

धुक्याआड तू पुन्हा एकदा
पहाट धुंडित उभी इथे मी.

व्यथेंन भिजल्या अंधाराच्या
सांडुनि सीमा लपली प्रीती,
लपली या रक्तांतुन सोशिक
उधाण ज्याचें गेलें हरवुन.

—गेलें हरवुन? विरघळलें तें,
या रक्ताच्या संथ प्रवाहीं.

(अजाणत्याशा क्षणीं एकदा
कालवलें पोटांतुन कांही :
विस्मरणाचें पातें जळतें
काय अचानक घुसलें हृदयीं?)

वेडें अंतर! नव्हतें माहित
या रक्ताचें अबोल नातें
जें दडलेलें खोल कुठेंसें....
खोल कुठेंसें....दुःखवेगळें.

तुलाहि तें दिसणार कसें....
धुक्याआड तू पुन्हा एकदा.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 60326 वि: काव्य
ग्रं 91612 नों दि 14-8-68

## दुपारच्या तल्खलींत

दुपारच्या तल्खलींत
बरसले मेघ मेघ :
गंधगूढ, आर्द्र आर्द्र
झालें सारें आसमंत.

तळपत्या दुपारींच
अंधाराची आली घडी
आणि झाली अवेळींच
विरहाची रात वेडी.

## हसत राहिलें

हसत राहिलें धुंदफुंद मी
आणिक जडली प्रीति जगावर.
क्षमा करावी आज व्यथेला
अन् रिझवावें दुःखहि कातर.

आवर्ताच्या त्या विळख्यांतुनि
कसें अचानक घडलें दर्शन
पाचूहिरव्या नितळ तळाचें
जिथे गतीचें नव्हतें मोहन.

लखलखणाऱ्या मासोळीची
चमचम बघतें जेथिल पाणी,
आवर्ताच्या वेढ्यांमधुनी
हळूच घेतें तिला ओढुनी.

गती न उरली हव्यासाची,
सरली भाषा भोवळवेडी;
गरगरणारें चक्रहि मिटलें
तृप्तीच्या रसरसत्या ओठीं.

## त्या रक्ताची

त्या रक्ताची आग पेटती
मला न भिडली, असह्य झाली;
विझवावी ती म्हणुनि धावलें
आणि पेटलें मीही पुरती.

अता न उरलें संचित दुसरें :
जळणें, आणिक जाळित जाणें,
धगधगणें अन् कधी न विझणें;
या जळण्याची चढली धुंदी.

या जळण्याची चढली धुंदी,
त्या रक्ताचा विखार भिनला;
अता न उरलें मी एकाकी :
या रक्ताची अखंड संगत.

## अशा बावऱ्या संध्येपाशी

अशा बावऱ्या संध्येपाशी
वीज व्यथेची द्यावी निखुन;
अशा अनावर मेघांपाशी
ओढ आतली द्यावी लोटुन.

तहानलेल्या धरणीपाशी
अशीच द्यावी प्रीती व्याकुळ;
असें उरावें, व्यथावेगळें,
असेंच सारें निखुन वादळ.

## पुन्हा पुन्हा मी ओंजळिमधुनी

पुन्हा पुन्हा मी ओंजळिमधुनी
        जवळ घेउनी घेतें हुंगुनि :
या गजऱ्याला गंध न येई मोगरिचा कां
हुंगहुंगतां कसे अभावित पडती भंवती,
पाश लाडके तव गंधाचे
ओसंडुनि मजभंवती फुटल्या तुझेपणाचे
तूच माळिल्या या गजऱ्याला कसा उरावा
गंध फुलांचा ?
        गंध तुझा हा....गंध तुझा.

## माझी अबोलीची प्रीत

माझी अबोलीची प्रीत,
तुझा चांफा गंधवेडा;
माझी स्वप्नभोळी जाई,
तुझा धुंदला केवडा.

माझी अबोलीची प्रीत,
तिचे बकुळीचे बोल;
धपापत्या मातीलाही
तिच्या गंधाची चाहूल.

माझी अबोलीची प्रीत,
तिचा मृद्‌गंधाचा श्वास;
तिच्यासाठी, तिच्यासाठी
तुझ्या प्राजक्ताची रास.

## स्वप्न धुंद त्या अर्धनिशेचें

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वामित्व.
अनुक्रम ........ वि: ........
ग्रंथ ........ नों: दि: ........

स्वप्न धुंद त्या अर्धनिशेचें
कसें पहावें मिटल्या नयनीं;
सरतां रजनी उरते धगधग,
स्वप्न विरघळे रक्तामधुनी.

तळ स्वप्नाचा बघण्याचें जर
घडलें पातक, तें शब्दातित;
उरतें एकच संचित दारुण :
घोट व्यथेचे घेणें हासत.

## घुसमटतें आभाळच जेव्हा

घुसमटतें आभाळच जेव्हा
हुंदडणारें, अवखळतें तें,
लपवाया मुख धुंडित जेव्हा
—आभाळ असें लपतें जेव्हा—
बिंदुगोठलें अंतर इवलें
म्हणतें उमलत, व्हावें मोठें....
व्हावें मोठें, आभाळाहुन,
आभाळाला लपण्याजोगें;
व्हावें मोठें किती केवढें,
—तुडुंबलेल्या कुशीएवढें :
आभाळानें यावें रांगत.

## आज हरवली

आज हरवली झोप कुठेशी :
पापणीतल्या असह्य राशी
स्वप्नशिळांच्या, आज फूलशा.
लाख चांदण्या दूर नभींच्या
आज धावल्या मनांत माझ्या.
लाख दीप हे जळीं उतरले
मौनमिठींतुन बघत राहिले.
आज घालिते व्यथाच फुंकर,
आज लोभलें मन रात्रीवर.

## त्या मोहरल्या दिवसांखातर

त्या मोहरल्या दिवसांखातर
विसरूं दे ही अदय चुकामुक;
उधाण ज्याने नेलें परतुन
विसरूं दे त्या हृदया सोशिक.

त्या मोहरल्या दिवसांखातर
विसरूं हें धगधगतें वास्तव;
तृषित सदा मी : मला पिऊं दे
त्या डोळ्यांतिल हसरें लाघव.

'असतें झालें–नसतें, जर–तर'
विसरूं दे ही भाषा कातर;
पुन्हा एकदा तसें फुलूं दे
त्या मोहरल्या दिवसांखातर.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ६०३२६
क्रमांक १७८२
१७०५
१५-८-६८

## हेंच शल्य रे

हेंच शल्य रे उरांत सलतें
तुला न कळलें मीपण मा
याच व्यथेने झालें विषमय
जीवन अवघें, शापित, मृण्मय.

याच व्यथेने झाली विषमय
प्रीत आपुली जगावेगळी
आणि मीलनातही राहिली
एक दूरता प्राणांमधली.

दूर अता तू. मी जळतें अन्
शोधित राहीं स्वप्नांतिल धन.
मी चिरविरही, शापित आपण
आणि शापही उःशापाविण.

## खरेंच सांगूं

खरेंच सांगूं, कितीकदा मज
येतें उसळुनि आतआतुनी :
तुला पहावें विद्ध, पोरकें
दुखवुनि मर्मी शब्दशरांनी....

हास्य तेंच अन् त्या वदनावर
ज्यांत झाकिलें अवघें अंतर
जावें पुसुनी, सुकुनी घडिभर;
लाघव गहिरें व्हावें कातर.

तुझ्या शांतिचें कठोर वैभव
क्षणांत जाउनि तडे ढळावें;
आंसु टिपाया अनमोलाचे
सर्वस्वाचें दान करावें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ........................ वि: ....................
.............................. नों: दि: ..........

## नाही कसें म्हणूं तुला

नाही कसें म्हणूं तुला :
तुझें तुझ्यापाशीं आलें;
नाही तुला म्हणायाला
माझेंच ना राहिलेलें.

नाही कसें म्हणूं तुला :
दान स्वप्नांचें अधूरें
घालुनीया ओंजळींत
द्यायलाच हवें सारें.

नाही कसें म्हणूं तुला—
क्षणाचीच जवळीक :
अंधारल्या आभाळांत
विजेचीच आगळीक.

विजेचेंच वेड माझें
कोसळूं दे याच माथीं;
तुझ्या आभाळांत निळ्या
वीजवेडी खूण त्याची.

## भिजल्या वाऱ्याचें

भिजल्या वाऱ्याचें असें बिलगणें :
डोळे भरुनी तुझें पाहणें;
ओलेत्या मातीचा गंध कोवळा;
अधीऱ्या श्वासांचा धूप कोंदला;
ओथंबलें नभ, वाकलें खालीं;
चढे प्रणयाचें आसव अमली;
विजेने दाविली ओसंडती वाट;
रक्ताची तहान, कलंडतो काठ;
सांडल्या धारा, निवली काहिली;
नेत्रांचीं कमळें झुकून मिटलीं.

## असा कधी ना

असा कधी ना उरांत फुटलों,
उरांत घेउनि शर ना हसलों.
असें कधी ना रक्तहि भळभळ
झरतां झरतां झालें स्वप्निल.

असे कधी ना प्राणांमधुनि
अंकुर आले वर सरसरुनी
आणि कधी ना वेदनेतुनी
गंधकळ्यांना फुटली वाणी.

नव्हती दिसली कृष्णघनाची
किनार झळझळत्या प्रीतीची,
नव्हतें झालें असें थरारुन
स्पर्शाच्या तारांचें मीलन.

कडकडुनी अन् नव्हती पडली
विद्युत् भरल्या मेघांमधली....
असें न कधिही, कधी न झालें
आणिक नव्हतें मीपण कळलें.

## हळूच नेलें

हळूच नेलें डोळ्यांपाशीं
धीट आग्रही काजळबोट,
थरथरणाऱ्या हाताला परि
मुळी न गवसे
....मुळी न गवसे....
पापणिचा ओलवता काठ.

## दिशा उजळल्या

दिशा उजळल्या (सवयीपुरत्या)
आणि फिकटली उषाहि आली
बधीरलेली....शिळया व्यथेसम;
तिच्या कपोलीं नव्हती लाली;

मीहि पाहिलें उघडुनि डोळे....
स्वप्न सारितां क्षणांत कळलें,
मळभ रात्रिचें गुदमरलेलें
अजून आहे मनीं टांगलें.

अजुन कोंडल्या आभाळाला
मुळी कुठेही वाट मिळेना,
अजून धुमसत आंत सांडते
अजून येथे रात्र सरेना.

## हळूच नेलें

हळूच नेलें डोळ्यांपाशीं
धीट आग्रही काजळबोट,
थरथरणाऱ्या हाताला परि
        मुळी न गवसे
        ....मुळी न गवसे....
पापणिचा ओलवता काठ.

## दिशा उजळल्या

दिशा उजळल्या (सवयीपुरत्या)
        आणि फिकटली उषाहि आली
बधीरलेली....शिळ्या व्यथेसम;
        तिच्या कपोलीं नव्हती लाली;

मीहि पाहिलें उघडुनि डोळे....
        स्वप्न सारितां क्षणांत कळलें,
मळभ रात्रिचें गुदमरलेलें
        अजून आहे मनीं टांगलें.

अजुन कोंडल्या आभाळाला
        मुळी कुठेही वाट मिळेना,
अजून धुमसत आंत सांडते
        अजून येथे रात्र सरेना.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम ६०३०६ वि: ७२१०५
क्रमांक १७८२ नों. दि: १५।१२।५८

## मिटून डोळे

मिटून डोळे घालुन त्यावर
घट्ट बाहुचा दाटर अडसर
तमास सरत्या घेतें कवळुनि
मिटले डोळे आंत बुडवुनी.

—तरी तळपतें नजर खिळवितें
लखलखणारें पातें जळतें;
उभें टांगलें या माथ्यावरि
हें दिवसाचें शस्त्र दुधारी.

## वाट तुझी पाहण्यांत

वाट तुझी पाहण्यांत
साठवलें सुख अपार;
यावें तू....येउं नये
मी न तुला सांगणार.

मी न तुला सांगणार
वाट सदा चुकलेली,
चिंतनिंच्या काननांत
रानभूल झालेली.

वाट सदा चुकलेली
ती न कधी गवसावी;
यावें तू....येउं नये....
स्वप्नांतहि धुडावी.

## वक्षावरती टेकुनि माथें

वक्षावरती टेकुनि माथें
ऐकत होतें स्पंदन आतिल
खिडकीपाशी पिंपळ तेव्हा
सळसळला पर्णांनी वेडा.

## त्या रात्रीला

त्या रात्रीला फुटले पंखहि
फूलपरीच्या लावण्याचे,
स्वप्नमयी अन् आली लहरत
गुंफुन हातीं कर चंद्राचे.

स्वप्न तिचें का होतें जपलें
त्या लाटांनी हृदयीं कोमल?
तिच्या पावलांसाठी होती
भिजलेल्या रेतीची मखमल?

क्षण रेंगाळुन फूलपाउलीं,
खुळ्या सागरा करुनी आतुर,
क्षणांत धरुनी चंद्रकरांना
स्वप्नमयी ती गेली मंथर.

गेली का....विरघळली तेथे?
नव्हतें कोणी तिलाहि साक्षी;
मात्र भाबड्या त्या लहरींना
छेडित होते पहाटपक्षी.

## अभ्रांच्या दाटींत हरवलें

अभ्रांच्या दाटींत हरवलें आभाळाचें लोभस रुपडें,
मुक्या व्यथेसम झालें जडशिळ, वाऱ्यालाही पडे साकडें.

मंत्रभारलीं पानें मिटलीं; कुणीं तयांवर करणी केली?
नक्षत्रांवर सावट भलतें अन् चंद्राची वाटहि चुकली...

नवल परी हें अशाच वेळीं अंतर वेडें स्रवूं लागलें;
दिवसाच्या चक्रांत गोठलें....दुःख भाबडें झरूं लागलें....

## अशा पहाटे

अशा पहाटे सरतें सावट,
दिशादिशांचें नितळ ललाट.

अशा पहाटे लोचनतीरीं
स्वप्नमधाने भिजतो काठ.

अशा पहाटे दहिंवर सांडे,
अंग धुक्याचें होतें ओलें.

अशा पहाटे चुकल्यामुकल्या,
स्वप्नामधला सुगंध उमलें.

## चार भिंती कधी काळीं

चार भिंती कधी काळीं धीट उभ्या राहतील,
नाव साजिरें कुणाचें माथ्यावरी रेखितील.

उंच गवाक्षांची माया झवलाल्या फुलांसाठी,
धुंद वाऱ्याचा धिंगाणा रुळणाऱ्या केसांपाठी;

दिमाखाची गच्ची अशी आभाळाने ओठंगावें,
चांदण्याच्या पावलांनी घरा भेटुनिया जावें;

अशी लावण्याची आभा हासायची कणांतून,
लाडलाडक्या जीवांची हौस जावी ओसंडून....
—घर तुमचेंच ! होय ! तुम्हांसाठीच फुलेल;
घर माझें ? पुरे आता, कुणी वेड्यांना हासेल !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर.
अनुक्रम ........................ दि: ........................

## हळूच येइन

हळूच येइन....पडदा सारुन
झुळुक तरळ जणु स्वप्निल चाहुल;
उशापायथ्याभवती तुझिया
मी विश्वाचें रेखिन वर्तुळ.

—अन् बाहूंचा लावुन अडसर
रोधिन अवघें उपरें पाउल;
भाळावरुनी फिरवित अलगद
अधरपिसांची कंपित मखमल.

सांगिन सारें आर्त जिवाचें
मनांत रुतलें, सललें कधिचें :
ऐकशील तू मिटल्या नयनीं
पापणिमधुनी झरेल पाणी.

आणिक कलतां सांजसाउली
खिडकीमधुनी निरखित आतुर
शब्दांवर मी चढविन लेणें
नभरंगांचें तुझ्याच खातर.

बघशिल तेव्हा या नयनांतुन
लवलेलें आभाळहि स्नेहल;
उशापायथ्याभवती तुझिया
मी विश्वाचें रेखिन वर्तुळ.

## डोळ्यांमधली बधीर तृष्णा

डोळ्यांमधली बधीर तृष्णा
साकळलेलें रक्त नसांतुन,
निपचित पाउल....पडलें मूर्च्छित,
भोवळ थरके कणाकणांतुन.

भोवळ असली पाखर झाली :
हिच्याच छायेमधि गुरफटलें;
क्षणभर गेलें हरवुन सारें
संवेदन तें....विरलें, विझलें.

एकच वाहे शीण भळभळा :
दूर कुठेसें घुमतें वादळ,
दूरच ती धगधगती जाणिव
दूरच सारें....भोवळ केवळ.

## गुलाबकळीच्या रंगात मिळावें

गुलाबकळीच्या रंगात मिळावें सोनचाफ्याचें केतकी लाघव,
रंगबावऱ्या तशा ढगांना घेतसे कुशींत नभाचें मार्दव.

लाजऱ्या बोटांनी प्राजक्तकळीने वाऱ्यास रेखिली गंधाची तिटी;
निमाले जीवाचे पाश निमिष, कोवळ्या भावांची हृदयीं दाटी.

झुळुक तरळ अरळ येऊन गंधांची उटी लावून गेली;
थर्थर आतुर राहिली पानीं; मख्मली व्यथा दाटून आली.

कितीक दिसांनी पाहिलें, हुंगिलें, अद्भुत अंतरीं दाटलें कसें;
धगींत पेटत्या लाविलें कोणीं लावण्यवेलीचें नाजूक पिसें.

## नितळनिळ्या अन् उजळमोकळ्या

नितळनिळ्या अन् उजळमोकळ्या
तृप्त नभाची पाखर आता;
वादळातुनी भिरभिरणाऱ्या
दीन फुलाची याद न आता.

तृप्तचित्त अन् शांतकाय मी :
याच क्षणांची मला मुक्तता;
आणिक पुढती....नकोच जाणिव....
याच क्षणांची पाखर माथां.

## भिंतींत कोंडलेला

भिंतींत कोंडलेला अंधार हा खरा ?
बाहेर निथळणारें तें चांदणें खरें ?

त्या धुंदल्या प्रकाशीं दिपतात आज डोळे,
त्या उजळत्या जगाचें चैतन्य येथ विझलें;
कोनांत जीव निखुनि, अंधार शोषतांना
मिटलेच नेत्र तरिही, तो दाह साहवेना.
भिंतींत कोंडलेल्या तिमिरास पूर येतां,
या काजळी जळाच्या विळख्यांत खोल जातां,
त्या शुभ्र चांदण्याला या घेरतात लाटा :
उघड्याच लोचनांना अंधार साक्ष आता.

## पहिल्या रात्रीच्या

पहिल्या रात्रीच्या आठवाव्या शपथा
        उजाड विजनात चाचपडताना,
तसा दिवसा जळणारा हा दिवा
        आज दिसतो केविलवाणा.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........ दि: ........
क्रमांक ........

## अंधारून आलें बाहेर

अंधारून आलें बाहेर की भिंतींचें घरटें होतें :
घरट्याच्या उबेंत विश्वाचें वर्तुळ मिटून जातें.
निळ्या सावलींत, आजचीं स्वप्नें घेतात डोळे मिटून
तेव्हा उद्याची आशा खुणावते क्षितिजाआड लपून.
(तिलाही झोपवायचे असते उद्या, असेंच थोपटून)
अंधारून आलें की सोबतीला व्यथाहि येते हसून.

## घ्यायलाच हवें कांही

"घ्यायलाच हवें कांही
        नाही जायचें तसेंच
शीण दाटला डोळ्यांत
        जाणतें ना मी सारेंच.
जगावेगळें हें सारें,
        वाऱ्यावरी येणेंजाणें :
क्षणाच्याच भेटीसाठी.
        धारेवरी उभें जिणें.
तसा कसा जाऊं द्यावा
        असा लाडका अतिथी;
घ्यायलाच हवें कांही,
        सांगायचें गडे, किती...."

—तोंच आले बोल कानीं
        खोल खोल घेतां श्वास,
पाहतांना डोळ्यांतून,
        "तू हवीस....तू हवीस."

## ओठ टेकतें

ओठ टेकतें....कणाकणावर
घडला होता स्पर्श तुझा.
भाळ टेकतें या वस्त्रांवर
खिळला होता गंध तुझा.

लोभ सांडतें या अंकावर
विरला होता भार तुझा.
स्नेह शिंपतें अन् वक्षावर
निवला होता दाह तुझा.

—प्रेम करावें मीं, माझ्यावर
जडला होता भाव तुझा.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम.............................. दि ......................
क्रमांक ............................ नों दि ....................

## भुरुभुरु पिंगट रेशिमजावळ

भुरुभुरु पिंगट रेशिमजावळ
भाळ टेकुनी हळू हुंगिलें;
सायसांडल्या गालांवरती
गाल घासुनी चुंबचुंबिलें.

अवचित आली हृदयीं भरती,
धुकें दाटलें डोळ्यांभवती;
वादळवेडी प्रीती अपुली
गतजन्मांतुन उठुनी आली.

(कवळुनि चिमणें गाढ उराशीं,
लपवित घुसळित मुख अंगाशीं
आवरिलें मी व्याकुल स्फुंदन
आणिक वळतां वरती लोचन....)

त्याच तुझ्या नयनांनी हासत
हासु तुझे तें गहिरें मिष्किल;
तुझेंच शैशव होतें निरखित
टक लावुनि मज हासत विस्मित.

## उन्हामध्ये पावसाला रुपडं येतं

उन्हामध्ये पावसाला रुपडं येतं,
डोळे भरून पहावं तर डोळ्यांत उतरतं;
उन्हामध्ये पावसाची झुलते वेली,
वेलीच्या दंडावर सोन्याची पाकोळी;
पाकोळीमागं भिरभिरतात डोळे
सळसळत्या धारांचं सोनेरी जाळं;
जाळ्यामध्ये कुणाची गवसली मासोळी
उन्हाची, पावसाची, डोळ्यांतली बाहुली ?
धारांनी उन्हाला जाळ्यामधे ओढलं,
पावसाचं बोट उन्हानं धरलं.

## निरोप दिलास तेव्हा सखी

निरोप दिलास तेव्हा सखी
        तुझ्या डोळ्यांत पाणी आलें :
त्या थेंबाच्या कुशीमधून
        तारू माझें लहरत गेलें.

## पुसट जरासें

पुसट जरासें भिजलें होतें
फूलपान अन् गवतहि हसरें,
आलि न आली सर ती लहरी,
अंगलगीनें चळले वारे.

अजून नव्हते मालवलेले
आभाळाचे दीप नाचरे,
अजून नव्हते झाले जागे
चराचराचे डोळे अधिरे.

"हवें अजूनी, अजुन हवें ना!"
देतच होते कुणी इषारे;
अर्ध्याभिजल्या कांतीवरती
फुलले होते दाट शहारे.

अर्ध्यामुर्ध्या प्रणयाचें तें
पाहियलें ना कौतुक न्यारें;
स्मरलें कांही उरिं सललेलें,
अवचित गेलें.... शल्यहि सारें.

कळलें नाही, जवळ कधी ते
वाकवाकुनी आले तारे;
अर्ध्या मिटल्या डोळ्यांना या
स्वप्नच आलें जणु सामोरें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ........................ दि: ..................
क्रमांक ........................ नों: दि: ..................

## अता घेतली झेप एकदा

अता घेतली झेप एकदा
वादळवेड्या आवर्तांतुन;
अता घेतला ठाव विलक्षण
गरगरणाऱ्या डोहतळांतुन.

कधीच सुटला देठांमधला
प्राणउबेचा बंद निवारा;
व्याकुळलेल्या गंधकळीला
भेटविला ना पिसाट वारा

रक्तभयाच्या अनघ पाखरा
अता लाविलें नख जन्माचें;
अजुन तरी कां तुटतां तुटतां
विद्ध भाबडें काळिज काचे

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ६०३७६ वि. काव्य
क्रमांक ९६८२ नों. दि. १५-८-६८

## माझ्या मनिंच्या पिसाट लाटा

माझ्या मनिंच्या पिसाट लाटा
तुला....तुलाही घेती वेढुन;
माझ्या मनिंची धगधग जळती
तुझा तजेला घेई शोषुन.

माझ्या मनिंच्या छाया दाट :
तुलाहि व्हावें भलतें सावट;
माझ्या मनिंची सुकली वेल,
तुझें सुकावें फुलतें फूल !

—असें न व्हावें, असें न व्हावें.
तू उमलावें, फुलत रहावें :
मालवलेल्या आभाळाला
चंद्रकरांनी रे सुखवावें.

## शिशिरामधल्या पहाटवेळीं

शिशिरामधल्या पहाटवेळीं
धुक्यांत दडलें पात्र नदीचें;
ऐलतिराहुन ढळलें पाउल,
पैलतिरावर स्वप्न कुणाचें....

## तळहाताच्या रेषांवरती

तळहाताच्या रेषांवरती
खिळले डोळे कसे कुणाचे;
रेषा कसल्या ? चिराच जखमी
जिथे टेकलें शस्त्र नियतिचें.

या रेषांवर कुणीं कोरिला
लेख विदारक वैफल्याचा;
तळहातींच्या चक्रांमधुनी
चक्रव्यूह हा होय जिण्याचा.

या रेषांच्या निबिड वनांतुन
किरणशलाका एक तळपते;
कांचनरेषा ही तिमिरांतुन
जीवन अवघें तोलुन धरते.

## पायांवरती चढली लाली

पायांवरती चढली लाली
त्या तिथल्या त्या लाल मातिची;
डोळ्यांमधुनी फिरलें काजळ
त्या तिथल्या हिरव्या धुंदीचें.

ह्रदयामधुनी भरलें वारें
खारें, न्यारें समिंदराचें;
धीट देखणें स्वप्नहि फुललें
त्या माडांचें—नभस्पर्शाचें.

## अक्षरांहून आहे बोलकी

अक्षरांहून आहे बोलकी
　　ही टिंबांची मुकी बोली....
लुकलुक डोळ्यांनी धरते
　　स्वप्नांची सोनसावली.

१६९५६

## हिरवळलेल्या छपरावरती

हिरवळलेल्या छपरावरती
ऊन रेशमी होतें हासत;
क्षणिं हुंकारत आलें रांगत
खट्याळ घुसलें मनांत अवचित.

घेउन आलें मुठींत झाकुन
निळ्या नभाची हाक भाबडी,
हिरवळलेलें स्वप्न कोवळें
अन् छपराची माया वेडी.

बघता बघता गेलें निसटुन,
जाता जाता....अवघें उजळुन....
क्षणांत वेडें गेलें घेउन
अंधाराचें ओझें दारुण.

## बांधिन घरकुल

“बांधिन घरकुल तुझें उन्हामधि”
असें न आता म्हणवत कांही;
घरट्यामधल्या पिलांफुलांसहि
असें न आता म्हणवत कधिही.

उन्हांत घरकुल वितळुन जातें,
उन्हांत घरकुल कणकण जळतें....
विझता विझता राख धुमसते,
पिशाच्च मनिंचें स्फुंदत फिरतें,
राखच जळती कवळित सुटतें....
उन्हात घरकुल कणकण जळतें.

“बांधिन घरकुल तुझें उन्हामधि”
असें न आता म्हणवत काही.

## चांदण्याच्या त्या क्षणाला

चांदण्याच्या त्या क्षणाला गंध भिजल्या मातिचा;
त्या क्षणांच्या ओंजळीला ध्यास होता अर्पणाचा.

नाहतांना त्या क्षणीं मी धुंदल्या साऱ्या कळा,
रुद्ध झाला कंठ तेव्हा मोकळा झाला गळा.

हासलें अन् आसवांनी, लाभलें तें काय सांगूं?
त्या क्षणांनी जें दिलें तें जीवनाशी काय मागूं?

ग्रीष्मकाळीं या अता तो सैरभैरा भ्रांत वारा,
मेघ वेडा त्या क्षणांचा वर्षतो ना येथ धारा.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम 60376 वि: का०४
क्रमांक 9682 नों दि: १५-८-६८

## आलिंगन डोळयांनी

आलिंगन डोळयांनी,
शब्दांची गाढ मिठी,
श्वासांचें वादळ तें,
—हें सारें मजसाठीं.

स्वप्नांच्या सीमेवर
तें सारें मजसाठी;
घेत उरीं वीजफुलें
पेटावें तुजसाठीं.

## पिसाट झाडें, सुसाट वारा

पिसाट झाडें, सुसाट वारा
        रहस्य यांचें सळसळणारें;
आषाढांतिल या प्रीतीला
        संगनमत हें हवेंच गहिरें.

हवीच आणिक आसुसलेल्या
        विद्ध धरेची हाक अनावर,
ज्या हाकेला धुंद ढगांनी
        हवेंच द्याया अधीर उत्तर !

हवेंच सारें अबोध....कातर;
        वादळवेडें आतुर अंतर;
आवर्तातुन हवा दिसाया
        डोहतळाचा हिरवा मर्मर.

## कसें साठवूं

कसें साठवूं या डोळ्यांमधि
हें अपुल्या प्रीतीचें लेणें;
इथेंच मिटले लोचन शिणले,
इथें पाहिलें स्वप्न देखणें.

आज भासलें येतां परतुन
भग्नच सारें नयनां बघणें;
खिळले लोचन, निवलें अंतर
दिसतां परि हें अभंग लेणें.

## काळजाची हाक वेडी

काळजाची हाक वेडी
भिडे मरणघडीला;
जन्म जन्म ओलांडून
जीव हातीं निरविला.

साक्ष ? भिजलीं लोचनें,
— विद्ध अधरीं चांदणें.
सांगणें हें एवढेंच
आणि उरलें साहणें.

...ठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलक्रम
अनुक्रम.......................... दि: ..........................
क्रमांक .......................... नोंद दि ..........................

## आरपार कापणारी

आरपार कापणारी
        धार तुझी अशी विखारी;
रक्तभरल्या पावलांनी
        वाट मागे धावणारी....

—पायवाटे सांडलेल्या
        लाल भिजल्या या खुणा
वेचुनी मी....मीच आता
        भांग माथीं रेखिलेला.

## चुकुन कधी जर

चुकुन कधी जर भिजले डोळे
भिजूं नको तू त्या थेंबांनी;
जळ कसलें तें—तें तर मृगजळ
थरथरणारें उठलें पेटुन
धगींत जळत्या आभासांतुन.
वाहुन जावें खळखळ पाणी
निर्मळ द्रवल्या स्फटिकावाणी;
अन् पाण्याला ओढ असावी,
नितळ तळाची साथ मिळावी,
हें नयनांचें भाग्यच तेव्हा
व्यथस होती वाणी जेव्हा !
आज रित्या या जुळ्या तळ्यांना
तळ कुठला तो आरसपानी;
गढूळलेल्या या पात्रातुन
उगिच कुठे ही थेंबाथेंबी....
(कसें उरावें धगींत असल्या
खळखळणारें निर्मळ पाणी.)
सांगुं तुला का म्हणून एकच :
चुकुन कधी जर भिजले डोळे,
भिजूं नको तू त्या थेंबांनी....

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम.......................... दि: ..........................
क्रमांक .......................... नों. दि ..........................

## किती तुझें तुझें व्हावें

किती तुझें तुझें व्हावें :
देठ देठ उन्मळावें;
रक्तधुंद पावलांनी
किती जन्म मागे जावें....
किती तुझें तुझें व्हावें :
प्राण वेड पाखडावे
— रोखल्या त्या लोचनांनी
हासुनीया 'मम' म्हणावें.

## रुळणारी बट माझी

रुळणारी बट तशी
बोटांनी सारिलीस
आणि तशा डोळ्यांनी
एकवार पाहिलेंस.

बोललें न कांहि मुळी,
हासले कसेंनुसें;
चित्र दूर फिकट मधुर
भरभरलें सांगुं कसें ?

मालवल्या डोळ्यांनी
पाहियलें चित्र पिसें;
मीच मला बघतांना
हासलें कसेंनुसें.

## पुसट जरासें

पुसट जरासें....आत कुठेंसें
हललें कांही....सललें नाही;
त्या बुझलेल्या जखमेला रे
अता न येइल जाग कधीही.

हें समजावें तुलाच आता
चाटुन गेला बाण जिव्हारीं;
टपटपलेल्या थेंबांमधुनी
हसलें होतें दैव विखारी.

त्या हास्याचें सावट भलतें
पडलें होतें या हृदयावरि
हें समजावें तुलाच आता
कारण वळलें मन माघारीं.

मात्र कधी त्या....त्या मातींतुन,
त्याच नभाच्या माथ्याखालुन
फिरतांना तू जरा स्मरावें
जगलों होतों—जसें जगावें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 60326 दि: 91084
क्रमांक 9662 नों. दि. 94-८-८८

## भगभगीत रखरखली

भगभगीत रखरखली
ही दुपार पेटली;
सुन्न बधिर वेदना
आत आत कोंडली.

म्लानवदन पारिजात
बहर संपला कधीच;
जीर्ण पाकळ्या उदास
शोधि बापुडा स्वतःच

एक विद्ध पाखरू
लोचनांत भिरभिरे;
लाल कोवळी कुठे
पालवीहि थरथरे

पालवींत त्या अता
क्षीण आस गुंतली;
ही दुपार पेटली.

## भरून आलें आभाळाला

भरून आलें आभाळाला :
झरले डोळे बघतां बघतां;
झरतां झरतां देउन गेले
तृप्तीलाही भोवळ आता.

भरून आलें आभाळाला :
त्या भरण्याने भरलें सारें;
'किती द्यायचें, किती घ्यायचें'
हिणवित सुटलें वेडें वारें.

कणाकणांनी, क्षणाक्षणांनी
किती द्यायचें, कुणाकुणाला;
कशास वेडें मंथन असलें,
भरून आलें आभाळाला.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ६०३४६ दि ९१०५
क्रमांक १७८२ नों दि १५-८-६८

## आवंढा गिळुनी

आवंढा गिळुनी, अश्रु लोटुनी जेव्हा
मीं म्हटलें त्याला, स्वरांत सांडित लाव्हा,
“क्षणिं धगधगुनी अन् सळसळुनी पेटावें
अन् क्षणांत विझुनी राखेंतुनी उधळावें
ही तुलाच असली शोभो विपरित रीती
जी प्रीतिस मानी वाऱ्यावरची गीती !
निष्ठेचा लेखच जिच्या न लिहिला भाळीं
अन् शोध जियेचा सरेल का कधि काळीं ?”
बोलून असें हें क्षणांत झालें स्तब्ध,
तों वळतां लोचन दिसलें तें मुख श्रांत.
“हो शोध....शोध तो जन्मभराचा होता....”
हें असें कांहिसें अस्फुट कानीं येतां,
त्या उदास नयनीं खोल कांहिसें दिसलें
अन् बघतां बघतां त्यांतच बुडुनी गेलें.

## चुकल्या वाटा

चुकल्या वाटा, सरली संगत, काचकाचुनी तुटले धागे
—तुटले धागे तरि न म्हणावें, कशास वळुनी बघणें मागे ?

प्राणपाखरू जातां उडुनी रक्तहि वेडें क्षणीं न निवतें;
सुकलें फूलहि कळ गंधाची कळल्यावाचुन जपत रहातें.

सरतां स्वप्नहि आठव गहिरा अलगद मागे ठेवुन जातें;
विरतां सूरहि हुरहुर व्याकुळ उगाच हृदयीं उरते, झुरते.

—चुकल्या वाटा, पुसले लोचन, जरा पाहुं दे वळुनी मागे;
म्हणतो कोणी, सरलि कहाणी; जरा जुळूं दे तुटले धागे.

## दाराबाहेर टाकितें

दाराबाहेर टाकितें आता निर्भय पाऊल :
उभें पाठीशी हें आज तुझें माझें भावबळ.
आज जडावलें सारें फुलाहून झालें फूल,
झुले भरमाध्यान्हीं या चांदण्याची माथीं झूल.

आज विजनवाटेला मला संग आठवाचा,
आणि दंडाशीं जाणवे स्पर्श कुणाच्या बाहूचा.

कसें उरीं परिमळे जगावेगळें हें गाणें;
भिडूनिया पैलतीरा कितीदा हें येणेंजाणें....

मराठी ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम ........ दि: ........
क्रमांक ........ नों दि: ........

## दार धरितें पदर

दार धरितें पदर,
        उंबऱ्याशीं लागे ठेच;
माथीं वाकलेलें घर
        पुसे, "जाणार?" हळूच.

मात्र धुंदला शेवगा
        निघताना हासे गालीं;
पाहिली ना काल त्याने
        रित्या क्षणांची काहिली.

## या अशा फितवुनी वाटा

या अशा फितवुनी वाटा अन् उधळुनि अवघीं नातीं
ही अशी वादळामधुनी मी येतें काजळरातीं.

हा उरांत सलता काटा मी खुडतें निघतां निघतां,
सोलीव सुखाच्या गर्भीं मी हसते अन् नवजाता.

मी न्हातें चंद्रजळाने, गुंफितें कुंतलीं तारा;
या धुंद पावलांमधुनी सांडती विजेच्या धारा.

या मुक्त शिरावर झरती आशीर्वच आभाळाचे
अन् भाळीं कुंकुम विलसे त्या उधाणल्या संध्येचें.

ही अशी अनावर येतें अन् फुलेंच पायीं चुरतें;
तें रक्त कोवळें कसलें—ही चरणीं मेंदी चढते....

## दुखावणें.... सुखावणें....

दुखावणें.... सुखावणें....
तुझें सारें माझ्यापाशीं :
तुझ्या सागराच्या लाटा
रुद्ध माझ्या किनाऱ्याशीं.

रक्तवेडी उधळण
पालवीते प्राण गात्रीं;
झरे तृप्त डोळ्यांमधी
चांदण्याची निळी कांती.

अशा धुंद प्रळयांत
जन्म कोवळा मिळावा
तुला. दूख माझ्या वक्षीं
अन् किनारा पाझरावा.

## ओठ दिले काजळले

ओठ दिले काजळले,
        ओठ दिले विझलेले;
—चांदण्यांत रसरसले
        आज जुळे वीजकळे.

ओठ दिले फिके, मुके,
        ओठ दिले रुखेसुके;
—शोषितां विखार कसें
        दंशिलेंस रक्तपिसें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

## झोपेंतहि

झोपेंतहि दूर जाऊं नकोस.
इवलेंसें बोट मुठींत देऊन होतें मी तोवर
स्वप्नांची पाखर.
झाकून घे तूही पापण्यांनी डोळे;
निवलेल्या रात्रीं ओघळलें हलकेच
ओठांचें फूल त्या पापणीवर.

## डोळ्यांच्या मासोळ्या

डोळ्यांच्या मासोळ्या
चळल्या मातल्या,
लोचनतीराशीं
दाविती वाकुल्या.

अडेल रात्रीची
हूल ही अनोखी;
स्वप्नांच्या सेतूची
वाटही पारखी.

निद्रेच्या काठाने
हिंडतां एकटी
अपाप येतें रे
तुझ्याच निकटीं.

## का स्वप्नच होतें

का स्वप्नच होतें
 तें येणें अन् जाणें ?
का स्वप्नच होतें
 तें हसणें, हासविणें ?

तें स्वप्नच सारें
 जें विरलें निमिषांत;
अन् सत्य एक हें
 अधरावरचें गीत.

## तो शब्दांचा भूलभुलैय्या

तो शब्दांचा भूलभुलैय्या, घमघमत्या जीवाच्या वाती,
तें श्वासांचें घुसमट-वादळ अन् रक्ताची सागरभरती....
—दूरच सारें ! दूरच भिजती तीं पाचूचीं बेटें हिरवीं
इथल्या विजनीं, कातरवेळीं, त्या स्वप्नाची साथ असावी.
त्या पाचूच्या बेटांमधुनी झुळझुळणारा निर्झर-पावा
इथे घुमावा प्राणांमधुनी अन् जीवाचा धूप जळावा.

## तशी मी जातें ना—

तशी मी जातें ना दूर एकटी—
मिटून घे डोळे
अन् जाऊं दे मला.
पहावेल का ठेवुन हाताचें अंतर
वणव्याच्या ज्वाला अन् जळणारें पाखरू ?
पाखडत्या प्राणांनी, लसलसत्या धारेला
पाहतें धरूं
आगीचें पाखरू.

१९९५६

## सांज कलते

सांज कलते अन् वाऱ्याचे पैंजण शेवग्याच्या पानांतून
रुणझुणू लागतात,
तेव्हा न कळता आयुष्याला क्षमा करावीशी वाटते.
उन्हांत बांधलेलं घर तावून तावून निवूं लागतं
तेव्हा वाऱ्याच्या लाटा अंगभर खेळत असतात.
त्या आवर्तांत गवसलेले श्वासांचे पक्षी भिरभिरतात
तेव्हा पोरक्या मनाचं अधांतर कुठेसा निवारा शोधूं लागतं.
वाऱ्याच्या लाटा अंगभर उसळत असतात,
वाऱ्याच्या लाटा रंध्रारंध्रातुन फुलत असतात,
तेव्हा वाटतं नियतीच्या शापाला मिळतो आहे उःशाप
आणि न कळता आयुष्याला क्षमा करावीशी वाटते.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ६०३७६ वि ७०१०५
क्रमांक ९६८२ नों. दि. २१।५।६८